# भारतीय शिक्षणपद्धतीतील बदल व नवीन शिक्षा नितीचे अवलोकन

**डॉ. कांचनमाला क्षीरसागर**
एल. ए. डी. कॉलेज, नागपूर
kanchan.gawate007@gmail.com

**सारांश :**

२९ जुलै २०२० रोजी पारित करण्यात आलेल्या नवीन शिक्षा नितीमध्ये अनेक महत्त्वपूर्ण परिवर्तन करण्यात आलेले आहे. नवीन शिक्षा नितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, नवीन शिक्षा निती ही बहुआयामी, आनंददायी व महत्वाचे म्हणजे व्यवसायाभिमुख आहे. यास्तव पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंतचे करण्यात आलेले परिवर्तन स्वागतार्ह आहे. या अंतर्गत संख्यात्मक मूल्यांकनाऐवजी कलात्मक व गुणात्मक कौशल्याला प्राधान्य देण्यात आलेले आहे. तसे भारतीय शिक्षणपद्धतीचा विचार करता याला प्राचीन संस्कृतीचा शैक्षणिक वारसा लाभलेला आहे. वैदिक काळापासूनच शिक्षणाला आमुलाग्र महत्व आहे याची साक्ष आपणाला नालंदा, तक्षशिला विद्यापीठाद्वारे मिळते. बदलत्या काळाप्रमाणे शिक्षणपद्धतीतही बदल झाल्याचेही आढळून येते. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात अनेक आयोग व समितींची स्थापना करून मोठया प्रमाणात शैक्षणिक परिवर्तन झालेले आहे परंतु त्यात लवचिकतेचा अभाव होता त्यामुळे ते शिक्षण एकमार्गी होते. कुठल्याही एका शाखेत प्रवेश घेतल्यानंतर त्या अध्ययनात इतर शाखेतील विषय घेऊन अध्ययन अशक्य होते. परंतु नवीन शिक्षा नितीमध्ये विषय स्वातंत्र्य असल्यामुळे विद्यार्थ्याला आपल्या आवडीनुसार अध्ययन करता येवू शकते सोबतच मातृभाषेला देण्यात आलेले प्राधान्य ही एक महत्वपूर्ण बाब आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण आनंदमय, रसमय होईल यात शंका नाही, फक्त याची अंमलबजावणी काटेकोर पद्धतीने होणे आवश्यक आहे.

**बीजशब्द :**

भारत, शिक्षण पद्धती, शैक्षणिक परिवर्तन.

**उद्दिष्टे :—**

१ भारतीय शिक्षणपद्धतीत झालेल्या बदलांचे अध्ययन करणे.

२ नवीन शिक्षा नितीचे अवलोकन करणे.

**गृहीत :**

परिवर्तनशील समाजानुसार शैक्षणिक परिवर्तन आवश्यक असतात.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन पद्धती दुय्यम समंकावर आधारित आहे. या अतंर्गत भारतीय शिक्षण पद्धतीशी संबंधित विविध प्रकाशित लेख न्यूज चॅनेल्स, व संकेतस्थळांद्वारे प्राप्त झालेल्या माहितीचा समावेश करण्यात आला आहे.

**प्रस्तावना :**

कुठल्याही देशाच्या नियोजनात्मक विकासात शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. शिक्षण हे मानवाच्या, समाजाच्या व राष्ट्राच्या विकासातील महत्वाचे साधन आहे. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, व्यावसायिक, वैज्ञानिक विकास हा शिक्षणाद्वारेच योग्य प्रकारे घडवून आणला जावू शकतो हे

सर्व ज्ञात आहे म्हणूनच शिक्षण ही सामाजिक विकासाची गुरूकिल्ली आहे असे म्हटल्या जाते. उत्तम नागरिक तयार करणे हेच शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट असते. जीवन जगण्याची कला म्हणजे शिक्षण होय. व्यक्ती लहानपणापासून जे शिकतो त्याच्या प्रत्यक्ष जीवनात सांगड घालण्याचा प्रयत्न करीत असतो. शिक्षणाद्वारेच व्यक्तीचे जीवन अधिकाधिक समृद्ध होत असते. शैक्षाणिक पद्धती, अभ्यासक्रम, शैक्षणिक वातावरण, शिक्षकाचा दृष्टीकोन यांचा परिणाम विद्यार्थी जीवनावर व पर्यायाने त्या देशातील अंतर्गत व्यवस्थेवर होत असतो. यास्तव भारतीय शिक्षणपद्धतीतील बदल व नवीन शिक्षा नितीचे अवलोकन करणे आवश्यक ठरते.

**चर्चात्मक विश्लेषण :—**

प्राचीन काळाच्या सुरूवातीस कुंटुंब हेच शिक्षणाचे केंद्र होते. हळूहळू जीवनशैलीतील बदलाप्रमाणे शिक्षणाची कक्षाही बदलत गेली व शिक्षणाचे नवे आयाम समोर येवू लागले. जे शिक्षण कुंटुंबकेंद्री होते त्याच्या स्वरूपात बदल होवून त्या विषयीचे नवीन उद्दिष्टे, सिद्धांत, नियम मांडल्या गेले. मुलांना वळण लावणे, मूल्य संस्कार करणे, सामाजिक-सांस्कृतिक रितींचे संक्रमण करून त्यांचा वारसा जतन करून ठेवणे या पुरोगामी विचारांना मागे सारून व्यावहारिक जीवन जगण्यास मदत करणे, उत्तम नागरिक तयार करणे, अंतर्गत शक्तींचा विकास, व्यक्तिमत्वाचा विकास या विचारांना प्राधान्य मिळत गेले. हर्बट स्पेन्सर यांच्या मते ''मनुष्याचे शील बनविणे म्हणजे शिक्षण.'' अर्थात केवळ विषय ज्ञान आवश्यक नाही तर व्यक्तिमत्वाचा विकास होणे महत्वाचे आहे.भारतीय शिक्षणपद्धतीचा विचार करता दोन प्रमुख कालखंडानुसार अध्ययन करणे आवश्यक आहे. एक वैदिक काळ व दुसरा आधुनिक काळ.

**वैदिक काळ :**

वैदिक काळातील शिक्षण हे सामाजिक परंपरा व संस्कृतीशी संबंधित होते. शिक्षणावर धार्मिकतेचा प्रभाव होता. 'आत्मविकास म्हणजे मोक्षप्राप्ती हे शिक्षणाचे पहिले व अंतिम ध्येय होते. त्याकाळी शैक्षणिक भाषा संस्कृत व शैक्षणिक केंद्र गुरूकूल असून गुरूगृही राहूनच शारीरिक, बौद्धिक व मानसिक विकास साधल्या जात असे. वयाच्या ८ व्या वर्षी उपनयन विधी करून गुरूकुलात प्रवेश मिळत होता. पुढे बुध्द्काळात शिक्षणाचे स्वतंत्र केंद्रे निर्माण झाली. नालंदा व तक्षशिला विद्यापीठे ही याची साक्ष देतात.तसेच स्त्रियांनाही शिक्षणात समानतेचा अधिकार प्राप्त होता असे संदर्भ मिळतात.

**आधुनिक काळ :**

आधुनिक काळाच्या सुरूवातीस भारतावर अनेक परकीय आक्रमण होत गेले. विशेषत: मुस्लिम राजवटीचा प्रभाव जास्त होता. काळाच्या परिवर्तनानुसार शिक्षणपद्धतीतही बदल झाला. यात प्रामुख्याने मक्तबा प्राथमिक तर मदरसा माध्यमिक अशी शिक्षणाची केंद्रे होती. पुढे स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर काळात शैक्षणिक परिवर्तन मोठया प्रमाणावर झाले. स्वातंत्र्यपुर्व काळात स्त्रियांच्या सुरक्षिततेचा गहन प्रश्न होता त्यामुळे शैक्षणिक अधिकारापासून त्या वंचित झाल्या तो अधिकार प्राप्त करण्यासाठी अनेक स्त्रियांना आजही झगडावे लागते आहे ही एक मोठी शोकांतिका आहे.म. फुले, ईश्वरचंद्र विद्यासागर, राजा राम मोहन रॉय, धोंडो केशव कर्वे, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांच्या कार्यामुळे स्त्रीशिक्षण अधिकार प्राप्ती सोबतच अनेक शैक्षणिक परिवर्तनेही झाली. १८१३ चार्टर ॲक्ट— अध्ययनात पौर्वात्य व पाश्चिमात्य असे दोन विचार प्रवाह, १८३४ लॉर्ड मेकॅले जाहिरनामा—भारतीय शैक्षणिक

पद्धतीनुसार अध्ययनास सुरूवात, १८५४ वुडचा खलिता –पाश्चिमात्य ज्ञानास प्राधान्य द्यावे अशी सर चार्ल्स यांची शिफारस व मद्रास, मुंबई, कलकत्ता या विद्यापीठांची स्थापना. १८८२ हंटर आयोग–लॉर्ड रिपन यांच्याद्वारा मांडणी करण्यात आली यात प्रामुख्याने स्त्री शिक्षणावरभर देण्यात आला. १९०२ भारतीय विद्यापीठ आयोग– लॉर्ड कर्झन यांनी मांडणी केली यात विद्यापीठीय कायदे पारित करण्यात आले. १९३७ सॅडलर आयोग– सर मायकेल सॅडलर यांनी मांडणी केली यात शिक्षण अध्ययनाच्या विविध प्रकारांवर शिफारस करण्यात आली. १९३७ वर्धा शिक्षण योजना– यात प्रामुख्याने म. गांधीच्या मुलोद्योगी शिक्षणाचा पुरस्कार करण्यात आला.

स्वातंत्र्योत्तर काळात १९४८ राधाकृष्णन् आयोग– डॉ. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची मांडणी करण्यात आली यात माध्यमिक व उच्चशिक्षणाची पुर्नरचना, व मातृभाषेला प्राधान्य देण्यात आले. १९५२ मुदलियार आयोग– ३+ ३+१ आकृती बंधाची मांडणी (३ वर्ष माध्यमिक, ३ वर्ष उच्च माध्यमिक, १वर्ष अकरावी). १९५८ दुर्गाबाई देशमुख आयोग– स्त्री शिक्षणासाठीचा १ ला आयोग. १९६१(NCERT) राष्ट्रीय संशोधन व प्रशिक्षण परिषदेची स्थापना, ही संस्था शालेय स्तरावरील पाठयपुस्तक निर्मिती, अभ्यासक्रम, प्रशिक्षण व मुल्यमापनातील संशोधन करण्याचे कार्य करते. १९६४ कोठारी आयोग– त्रिभाषा सुत्राचा पुरस्कार (मातृभाषा, राष्ट्र भाषा हिंदी, इंग्रजी), १०+ २+३ अशा आकृतीबंधाची मांडणी (१ली ते ३री शाला पूर्व, ४ थी ते ५वी निम्न प्राथमिक, ६वी ते ८ वी उच्च प्राथमिक, ९वी ते १०वी माध्यमिक, ११वी ते १२वी उच्च माध्यमिक व पुढील ३वर्ष पदवी), १०वी नंतर कला, वाणिज्य, विज्ञान शाखानिहाय शिक्षणास सुरूवात. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, यासाठी अनेक शिफारसी करण्यात आल्या. १९८६ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण– माध्यमिक शिक्षणात संगणक प्रशिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनावर विशेष भर, खडू फळा मोहिम, नवोदय विद्यालयांची स्थापना व मुक्त विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. याशिवाय १९६८ डॉ. त्रिगुणा सेन समिती, १९७७ राष्ट्रीय आढावा समिती, माल्कम आदि शेषय्या समिती, शालेय शिक्षण सुधार समितीद्वारे महत्वपूर्ण शिफारसी करण्यात आल्या जसे औपचारिक व अनौपचारिक शिक्षणावर भर, मूल्यमापन सुधारणा, मिड डे मिल इ. महत्वपूर्ण आहेत.

**नवीन शैक्षणिक सुधारणांची आवश्कता :**

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानंतर ३४ वर्षांनी बदल करून नवीन शिक्षा निती २९ जुलै २०२० पासून लागू करण्यात येत आहे. बदलत्या परिस्थितीनुसार शैक्षणिक परिवर्तन करणे आवश्यक असतात. अनेक वेगवेगळया योजना, समितीमार्फत सर्वांना शिक्षण मिळावे यासाठी बऱ्याच शिफारसी करण्यात आल्या. शिक्षणाचा मूलभूत गरजेमध्ये समावेश करण्यात आला. परंतु वेगवेगळया कारणास्तव काही शिक्षणापासून वंचित तर काहींना अध्ययन पूर्ण होण्यापुर्वीच शिक्षण सोडावे लागते आहे. शाळा-महाविद्यालयांच्या संख्येत वाढ होवूनही सर्वांना समावेशित करण्यास ती अपुरी ठरली आहे. सध्या शिक्षणप्रणाली केवळ कारकुन तयार करणारी असल्याचे दिसते कारण यात व्यावसायिक शिक्षणाचा पाहिजे तसा प्रभाव आढळून येत नाही किंबहुना लोकांचा दृष्टीकोनही त्याबद्दल नकारात्मक असल्याचा दिसतो. यासोबतच व्यावसायिक शिक्षणासाठी लागणाऱ्या आर्थिक पाठबळाची कमतरता, पाश्चात्य जीवनशैलीची ओढ ही काही महत्वपूर्ण कारणे आहेत ज्यामुळे स्वयंरोजगार निर्माण होण्याऐवजी रोजगार शोधणाऱ्यांच्या संख्येत अधिकाधिक वाढ होत आहे. दुसरीकडे परदेशी शिक्षण घेण्याऱ्यांच्या संख्येत वाढ होते आहे आणि

परदेशी शिक्षण घेतल्यानंतर भारतात परत येण्याची मानसिकता फार कमी आहे त्यामुळे विकसित श्रमकौशल्याचा उपयोग देशाला होण्याऐवजी परदेशांना होतोय ही एक चिंतनीय बाबआहे.

सध्याच्या शिक्षणप्रणाली अंतर्गत गुणात्मक मूल्यमापनाऐवजी संख्यात्मक मूल्यमापन, स्पर्धा यांना प्राधान्य दिल्या जात आहे. विद्यार्थ्यांची पटावर असलेली संख्या आणि प्रत्यक्ष उपस्थिती यात मोठया प्रमाणात तफावत आहे. विद्यार्थी केवळ आवश्यक पदवी प्राप्त करण्यासाठी घौडदौड शर्यत करीत आहेत त्यामुळे घेत असलेल्या ज्ञानाचा ही ते पूर्णपणे अनुभवू घेवू शकत नाही. एवढे करूनही जेव्हा सुशिक्षित बेरोजगार होण्याची पाळी येते तेव्हा नैराश्य येते व या नैराश्यातून अनेक समाज विघातक कार्य तर कधी स्वत्वाचा अंत ही केल्या जात आहे कारण शिक्षण घेतानांची पाहिलेली स्वप्ने जेव्हा प्रत्यक्षात पूर्ण करू शकत नाही तेव्हा अशा मार्गाशिवाय पर्याय उरत नाही म्हणून शिक्षणाने जसासमाज घडतो तसा बिघडतोही यास्तव शैक्षणिक परिवर्तन आवश्यकच ठरते.

**नवीन शिक्षा नितीचे अवलोकन :**

नवीन शिक्षा निती २९ जुलै २०२० रोजी पारित करून या अंतर्गत मानव संसाधन मंत्रालय हे नाव बदलून शिक्षण मंत्रालय करण्यात आले. यामध्ये अनेक महत्वपूर्ण बदल करण्यात आलेले आहे त्यातील काही प्रमुख असे की, १०+ २+३ याऐवजी ५+ ३+३+४ या नवीन आकृतीबंधाची मांडणी करण्यात आली या अंतर्गत पायाभूत शिक्षण पुर्व प्राथमिक तीन + १ ली व २ री (३+ २=५); पूर्व माध्यमिक प्राथमिक शिक्षण : ३री, ४थी व ५वी ; माध्यमिक शिक्षण : ६वी, ७वी व ८वी ; उच्च माध्यमिक शिक्षण : ९वी, १०वी, ११वी व १२ वी अशी रचना करण्यात आली असून यामध्ये बोर्डाच्या परीक्षेचे महत्व कमी होवून वर्षातून दोन वेळा सेमिस्टर पद्धतीने परीक्षा घेतल्या जाईल. मातृभाषेला प्राधान्य देण्यात आले असून शिक्षणाची सुरूवात मातृभाषेतून करून पुढे एक किंवा त्यापेक्षा अधिक भाषेची निवड करता येईल अर्थात एक भाषित्वाकडून बहुभाषित्वाकडे जाणारा हा प्रवास आहे. इयत्ता ६वी पासून व्यावसायिक अभ्यासक्रम शिक्षणाचा अविभाज्य भाग करण्यात आलेला आहे ही एक अतिशय चांगली बाब आहे. नवीन शिक्षा निती ही बहुआयामी आहे म्हणजे विद्यार्थ्याचा कल ज्याकडे आहे त्या प्रमाणे त्याला अध्ययन करता येईल अर्थात त्याला विज्ञान शाखेत प्रवेश घेतल्यानंतर कला शाखेतील एखाद्या विषयाची आवड असल्यास तो विषय घेवून पदवी प्राप्त करता येवू शकते सोबतच पदवी पद्धतीतही बदल करून त्याचे प्रमाणीकरण करण्यात आले आहे यानुसार एक वर्षासाठी पदविका, दोन वर्षासाठी उच्च पदविका, तीन वर्षासाठी पदवी, चार वर्षासाठी उच्च पदवी देण्यात येईल. यामुळे समजा अध्ययन पूर्ण होण्याआधीच शिक्षण मध्येच सोडावे लागल्यास आधीचे वर्ष वाया जाणार नाही. बहुआयामी शिक्षा निती असल्यामुळे महाविद्यालयांचेही एकशाखीय स्वरूप बदलून ते बहुशाखीय होतील त्यामुळे शिक्षणपद्धती विकेंद्रीत होईल यासाठी शिक्षण संकूल योजना हा एक महत्वाचा भाग आहे. शिक्षण संकूलाच्या केंद्रस्थानी सक्षम शाळा व महाविद्यालये असून त्यांच्या आजूबाजूला असलेल्या छोटया शैक्षणिक संस्थांना सक्षम करण्याची जवाबदारी यांच्यावर सोपविण्यात येणार आहे. विविध विषयांचे शाखानिहाय अध्ययन व व्यावसायिक शिक्षणाच्या दृष्टीकोनातून हे शिक्षण संकूल अतिशय महत्वपूर्ण ठरणार आहेत. भारतीय संस्कृती प्राचीन काळापासूनच समृद्ध आहे. विविध नाटके, काव्य- कांदबऱ्या, प्राचिन ग्रंथ या साहित्यातील तत्वज्ञानाद्‌वारे नवीन शिक्षा नितीअंतर्गत प्रगत तंत्रज्ञानाशी समन्वय साधण्याचा प्रयत्न होतो आहे.

**निष्कर्ष :**

सर्वांगिण प्रगतीचे व परिवर्तनाचे द्योतक म्हणजे शिक्षण होय. उपरोक्त विश्लेषणावरून दिसून येते की, स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात अनेक शैक्षणिक परिवर्तने झाली. भारतात शिक्षणाचे महत्व प्राचीनकाळापासूनच असल्याचे दिसते. या काळी शिक्षणात मौखिकी पद्धतीवर अधिक भर होता तसेच गुरूकुलामध्ये बौद्धिक ज्ञानासोबत शस्त्राभ्यासही शिकविल्या जाई आणि जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आत्मविकास असल्यामुळे बौद्धिक, शारीरिक व मानसिक विकास साधल्या जात होता. स्वातंत्र्यपूर्व ब्रिटीश कालखंडात शिक्षणाच्या कक्षा वाढल्या असल्या तरी शिक्षणाचा पाहिजे तसा विकास झाला नाही कारण यात मातृभाषेपेक्षा इंग्रजी भाषेला प्राधान्य व नोकरदार वर्गांची निर्मिती करण्यावर विशेष भर असल्याचे दिसते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात जीवनशैलीत बदल होत गेला त्या प्रमाणे शैक्षणिक परिवर्तनही होत गेले. विविध आयोग व समितीद्वारे सार्वत्रिक शिक्षण, मोफत शिक्षण, मागासवर्गीय व स्त्री शिक्षणास प्राधान्य, शैक्षणिक संस्थांमध्ये वाढ अशा अनेक शिफारसी शिक्षणाच्या दर्जात वाढ करण्याच्या दृष्टीने करण्यात आल्या परंतु याला पाहिजे तसे यश मिळाले नाही उलट संख्यात्मक मूल्यमापनाला महत्व दिल्या गेले आणि आनंदमय शिक्षणाची जागा स्पर्धात्मक शिक्षणाने घेतली, शिक्षण क्षेत्रात राजकीय हस्तक्षेप वाढून त्याचे बाजारीकरण होवून सुशिक्षित बेरोजगारांच्या संख्येत वाढ होत गेली. 'शिक्षण म्हणजे वाघिणीचे दुध : जो ते घेतो तो डरकाळी फोडतोच' अशी मराठी भाषेत म्हण आहे. परंतु ते शिक्षण डरकाळी फोडण्याच्या योग्यतेचे असणे आवश्यक आहे, अर्थात घेतलेल्या शिक्षणातून किमान मूलभूत गरजांची पूर्तता होणे अपेक्षित आहे. उपजिविकेचे साधन मिळविण्यासाठी आणि विविध कौशल्याद्वारे स्वविकासासाठी शिक्षण उपयोगाचे असते. शिक्षण ही अखंडपणे चालणारी क्रिया आहे म्हणून त्यात अद्ययावत बदल होणे आवश्यक असते. नवीन शिक्षा निती सर्व समावेशक, आणि भविष्याचा वेध घेणारी आहे. याची सकारात्मक बाजू म्हणजे शिक्षण पद्धतीतील लवचिकता आणि व्यावसायिक शिक्षणाची अनिवार्यता यामुळे विद्यार्थ्यांची कार्यक्षमता वाढून ते आत्मनिर्भर होतील असे म्हणता येते. प्राचीन काळातील शिक्षण पुस्तकी ज्ञानाऐवजी कौशल्यावर आधारित होते आणि नवीन शिक्षा निती ही कौशल्य वाढीला चालना देणारी आहे. यास्तव ही निती प्राचीन भारतीय संस्कृतीशी मेळ घालणारी आहे. या शिक्षा नितीला शैक्षणिक संस्थाचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाल्यास देशातील परिवर्तनाचे हे एक महत्वाचे पाऊल ठरणार आहे.

**संदर्भ :**

१. History of Education in India : Syed Nurullah& J. P. Naik
२. KOTHARI COMMISSION REPORT:
३. 1986 National Policy on Education- Wikipedia
४. National education policy 2020
५. India Today News Channel : 7 Aug. 2020
६. तरूण भारत २२ सप्टेंबर २०२०
७. सकाळ ३१ जुलै २०२०